



## १२. सलाम–नमस्ते !

माझ्या तोंडून शब्द फुटेना.

शेखनं डाव्या हाताच्या बोटांनी डोळे पुसले आणि खिशातून एक पाकीट काढलं. ''मॅडम, हे तुमच्यासाठी आहे. झुबेदानं पाठवलंय. मला यायला उशीर झाला त्याबद्दल सॉरी हं.''



मी तो लिफाफा उघडला. आत तीन हजार रुपये होते. मी गोंधळून शेखकडे पाहिलं. ''मॅडम, तुम्ही पन्नास हजार दिले होते; पण झुबेदाचं ऑपरेशन आणि औषधपाण्यासाठी फक्त सत्तेचाळीस हजारच खर्च आला. आपण आता यातून काही वाचत नाही हे जेव्हा झुबेदाला समजलं, तेव्हा ती म्हणाली, 'आपण उरलेले पैसे मॅडमना परत करू. निदान दुसऱ्या कुणाच्यातरी उपयोगाला येतील. एखादा नशीबवान असेल, त्याचा जीवतरी वाचेल. आता हे पैसे माझ्यावर खर्च करून वाया घालवायला नकोत आपण.' ''

माझ्या नकळत माझ्या डोळ्यांतलं पाणी गालावरून वाहू लागलं. मी झुबेदाला कधीच भेटले नव्हते; पण दुसऱ्यांविषयीची तिच्या मनातली ही कळकळ पाहून मी थक्क झाले.

इतक्या गरिबीत आणि यातना सहन करतानासुद्धा तिनं दुसऱ्या गरजू रुग्णांचा विचार करावा, ही गोष्ट विस्मयचकित करून सोडणारी होती. आपण स्वत: संकटाशी झुंज देत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळच ! इथे तुमचं शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते.

मी तो लिफाफा तसाच शेखला परत देऊन म्हणाले, ''हे पैसे तबस्सुमसाठी आहेत. अल्लाची तिच्यावर मेहेरबानी असू दे. तिला नीट शिकू दे. तुला जर काही मदत लागली, तर प्लीज मला सांग. इतरांविषयी करुणेची भावना बाळगण्याच्या बाबतीत ती आपल्या आईच्याही चार पावलं पुढे जाऊ दे. आपली ही जी भूमी आहे ना, ती श्रीमंत का आहे, माहीत आहे? सोन्याच्या किंवा हिऱ्याच्या खाणी तिच्या पोटात आहेत, म्हणून नव्हे. या झुबेदासारख्या लोकांमुळेच तिचं ऐश्वर्य वाढणार आहे.''

तबस्सुम नुसती तिथे बसली होती. तिला काहीच कळत नव्हतं. माझे शब्द पचनी पडणं शेखलाही कठीण जात होतं.

***

https://en.wikipedia.org/wiki/Sudha_Murthy

ऑनलाईन टेस्ट

वाचा व समजून घ्या.

# 10 बँक व सरळव्याज

सराव

3NAQTQ

**जरा आठवूया.**

बँक ही पैशांचे व्यवहार करणारी सरकारमान्य संस्था असते. बँकेमुळे पैशाचे नियोजन म्हणजे अर्थनियोजन करणे सोपे जाते. बँकेमध्ये रोख रकमेचा भरणा करणे किंवा रोख रक्कम काढणे असा व्यवहार करता येतो. त्यासाठी बँकेत खाते उघडावे लागते. बँकेमध्ये विविध प्रकारची खाती असतात.

**जाणून घेऊया.**

## विविध खाती

### ✱ चालू खाते (Current account)

चालू खाते मुख्यत: व्यापाऱ्यांसाठी व रोज पैशांचे व्यवहार करणाऱ्यांसाठी असते. यामध्ये खातेदार एका दिवसात कितीही वेळा देवघेव करू शकतो. बँक या खात्यासाठी पासबुक व मागणी केल्यास चेकबुक देते. या प्रकारच्या खात्यावर बँक व्याज देत नाही. चेकच्या साहाय्याने बँकेत पैसे भरता येतात किंवा बँकेतून पैसे काढता येतात.

### ✱ बचत खाते (Savings account)

खातेदाराला ठरावीक रक्कम बँकेत जमा करून बचत खाते उघडता येते. काही बँकांमध्ये काहीही रक्कम जमा न करता खाते उघडता येते. या खात्यावर दररोजच्या जमा शिलकेच्या आधारे बँक काही व्याज देते. अनेकदा ठरावीक काळामध्ये किती वेळा पैसे काढता येतात यावर निर्बंध असतात. या खात्यासाठी बँक पासबुक व मागणीनुसार चेकबुक देते.

### ✱ आवर्ती ठेव खाते (Recurring deposit account)

या खात्यामध्ये दर महिन्याला ठराविक रक्कम जमा करतात. ती किती असावी हे बँक खातेदार ठरवतात. या प्रकारच्या ठेवींवर बँक व्याज देते. हे व्याज बचत खात्यापेक्षा जास्त असते, अशा खात्यामुळे खातेदाराची सक्तीची बचत होते.

उपरोक्त खात्यांसाठी बँकेत कधी कधी संयुक्त खाते असणे सोईचे असते. उदा., पति-पत्नी, पालक व पाल्य इत्यादी. तसेच व्यवसायातील भागीदारी, हाउसिंग सोसायटी, सेवाभावी न्यास इत्यादींसाठी बँकेतील खाते एकाहून जास्त व्यक्तींना वापरणे जरुरीचे असते.

### ✱ मुदत ठेव (Fixed deposit)

ठेवीदार ठरावीक रक्कम ठरावीक कालावधीसाठी बँकेत जमा करून ठेवतो. या प्रकारच्या ठेवींवर बँक बचत खात्यापेक्षा अधिक व्याजदर देते. मुदत ठेवींवरील व्याजदर प्रत्येक बँकेत भिन्न असू शकतो. ज्येष्ठ नागरिकांना नियमित दरापेक्षा थोडा जास्त व्याजदर मिळतो.

**क्रेडिट, ए.टी.एम/डेबिट कार्ड :** बँकेत न जाता रोख रक्कम मिळवण्यासाठी ATM (Automated teller machine) कार्डाचा उपयोग होतो. रोख रकमेशिवाय व्यवहार करण्यासाठी क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड वापरता येते. ही कार्डे विनंतीवरून त्या बँकेच्या खातेदारास मिळू शकतात.

**वाचा व समजून घ्या .**

gurumauli

# 10 Banks and Simple Interest

ZAX3UN

## Let's recall.

A bank is a government recognized institution that carries out transactions of money. Banks make it easier to plan the use of money, i.e., to do financial planning. We can either deposit cash money in a bank or withdraw cash from it. For that purpose, we must open an account in a bank. Bank accounts are of various kinds.

## Let's learn. Different Types of Accounts

### ✱ Current Account

A current account is mainly for traders and those dealing in money on a daily basis. An account holder can deposit or withdraw money any number of times in a day. The bank issues a passbook for this account and also a cheque book on demand. The bank does not pay any interest on the money in this type of account. Money can also be withdrawn or deposited by cheque.

### ✱ Savings Account

A person can deposit a minimum amount and open a savings account. In some banks, no minimum amount is required for opening an account. The bank pays some interest on the basis of the daily credit balance in the account. There are some restrictions on how often money can be withdrawn from this account. For this account too, the bank issues a passbook and, on demand, a cheque book.

### ✱ Recurring Deposit Account

The account holder can decide the amount to be deposited every month in the account. The bank gives an interest on the deposit which is more than that paid for the savings account. Such an account is a means of compulsory savings.

Often it is convenient to have a joint account for say, husband and wife or guardian and ward, etc. Besides, accounts of business partners, housing societies, trusts of voluntary agencies, etc. are required to be operated by more than one person.

### ✱ Fixed Deposit

A depositor deposits a certain amount for a fixed period in the bank. This deposit attracts a greater rate of interest than the savings account. However, these rates are different in different banks. Senior citizens get a slightly greater rate of interest than the usual.

**ATM, credit and debit cards :** An ATM (Automatic Teller Machine) card is used to withdraw cash without going to a bank. A credit card or debit card is used to carry out transactions without using cash. An account holder can get such a card on request to the bank.

gurumauli

understand.

## 3.3 News Analysis



Many people believe that all that is printed on paper must be true and reliable. But we also come across bits of information or news items that do not match, or do not tally with facts, our own experiences, ideas, etc. It is necessary to think well and carefully about what we read or hear before we form our opinion. Of course, you must do it with an open mind.

Do you read newspapers every day? Do you listen to the news bulletins on radio or TV? You may have seen your elders or friends reading news items and discussing them with feeling.

Do you think about the news that you read or hear? If a piece of news makes you happy, you will say it is **good** news. If it makes you angry or sad, you will say it is **bad** news.

You may find some news items **interesting** and some others **uninteresting** or even **boring**.

You also have to consider whether a piece of news is **reliable** or **unreliable**. Many news items have phrases like 'according to our sources', 'authorities say that', 'an eye witness account', etc. to convince the readers or viewers that the news is reliable. Or the reporter may simply say 'It is learnt that....'. 'It has come to light that.....', etc.

Read the news items given in (a), (b), (c) and (d). You may have heard phrases like 'breaking news', 'shocking news', etc. In what other ways can we describe a piece of news? Suggest suitable adjectives. Then form groups of four or five and discuss the questions given with each piece of news.

- with feeling : in a way that shows how they feel about it – angry, happy, etc.
- authorities : people who are in control.
- eye witness : An eye witness is someone who has seen something with his / her own eyes.
- account : report, story

You may have heard phrases like 'breaking' news etc. What other adjectives do people use for news?

**Warming up!**



understand.

# ९. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम

संभाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने व युद्धकौशल्याने त्याचे हे स्वप्न धुळीस मिळवले. त्यांच्या फौजेच्या तुकड्या अनेक मुघली प्रदेशांत स्वाऱ्या करत होत्या. मराठ्यांचा नाशिकजवळचा रामसेजचा किल्ला तर बादशाहच्या सेनानींना दीर्घकाळ प्रयत्न करूनही घेता आला नाही. अशा प्रकारे संभाजी महाराजांच्या पराक्रमाने औरंगजेब जेरीस आला होता. त्यामुळे एकदा अत्यंत संतापाने त्याने आपल्या डोक्यावरचे पागोटे जमिनीवर आपटले व प्रतिज्ञा केली की, ‘‘या संभाजीचा पाडाव करीपर्यंत मी पुन्हा पागोटे घालणार नाही.’’ संभाजी महाराजांनी औरंगजेबाला इतके हतबल करून टाकले होते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

मराठ्यांचे किल्ले जिंकले की त्यांचे राज्य संपेल या विचाराने सुरुवातीस औरंगजेबाने नाशिकजवळील रामसेज किल्ल्याला वेढा घातला. औरंगजेबाची सैन्यसंख्या मोठी होती. मराठ्यांची सैन्यसंख्या अतिशय कमी होती. पण त्यांनी चिवट प्रतिकार केला. हा वेढा पुढे पाच वर्षे चालला. मूठभर मराठी सैनिकांनी केलेला हा पराक्रम अद्‌वितीय होता. मराठ्यांच्या चिवट प्रतिकारामुळे मराठ्यांशी संघर्ष करणे अवघड असल्याची जाणीव औरंगजेबाला झाली.

**सिद्दीविरुद्धची मोहीम :** जंजिऱ्याचा सिद्दी मराठी मुलखाला उपद्रव देत असे. मराठ्यांच्या मुलखावर धाडी टाकून तो जाळपोळ, लुटालूट व अत्याचार करत असे. ‘घरात जैसा उंदीर, तैसा राज्यास सिद्दी’ असे त्याचे वर्णन सभासदाने केले आहे. संभाजी महाराजांनी इ.स.१६८२ मध्ये त्याच्याविरुद्ध मोहीम उघडली. त्यांच्या सैन्याने त्याच्या ताब्यातील दंडाराजपुरी या किल्ल्याला वेढा घातला आणि जंजिऱ्यावरही तोफांचा भडिमार केला. परंतु त्याच वेळी मुघलांचे सैन्य स्वराज्यावर चालून आले. त्यामुळे जंजिऱ्याची मोहीम अर्धवट सोडून संभाजी महाराजांना माघारी फिरावे लागले.

**पोर्तुगिजांविरुद्ध मोहीम :** गोव्याच्या पोर्तुगिजांनी संभाजी महाराजांच्या विरुद्ध बादशाहाशी हातमिळवणी केली होती. त्यामुळे त्यांनी पोर्तुगिजांना धडा शिकवण्याचे ठरवले. त्यांनी इ.स.१६८३ मध्ये पोर्तुगिजांच्या रेवदंडा बंदरावर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगिजांनी गोव्याच्या सीमेवरील मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यास वेढा घातला. मराठ्यांनी वेढा मोडून काढला आणि गोव्यावर चढाई केली. या लढाईत येसाजी कंक याने पराक्रमाची शर्थ केली. यात पोर्तुगीज गव्हर्नर घायाळ झाला. त्याला माघार घ्यावी लागली. संभाजी महाराजांनी त्याचा पाठलाग केला. पोर्तुगीज मोठ्या संकटात सापडले. त्याच वेळी मुघलांनी दक्षिण कोकणवर आक्रमण केल्याची बातमी संभाजी महाराजांना मिळाली. त्यामुळे हाताशी आलेला गोव्याचा विजय सोडून त्यांना मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी परतावे लागले.

**आदिलशाही व कुतुबशाहीचा शेवट :** औरंगजेबाला मराठ्यांविरुद्धच्या मोहिमेत यश येत नव्हते. त्यामुळे त्याने ती मोहीम स्थगित केली. त्यानंतर त्याने आपला मोर्चा आदिलशाही व कुतुबशाही या राज्यांकडे वळवला. औरंगजेबाने ती राज्ये जिंकून घेतली.

या दोन्ही राज्यांची संपत्ती व लष्कर मुघलांच्या हाती आल्यामुळे औरंगजेबाची स्थिती मजबूत झाली. त्यानंतर मराठ्यांचा पाडाव करण्यावर आपली सर्व शक्ती केंद्रित केली. त्यांच्या प्रदेशावर चोहोबाजूंनी हल्ले चढवले. मुघल सेनेचा प्रतिकार करताना मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते मारला गेला. त्यामुळे संभाजी महाराजांची लष्करी बाजू कमकुवत झाली.

**संभाजी महाराजांचा मुलकी कारभार :** संभाजी महाराजांनी युद्धाच्या या धामधुमीत आपल्या मुलकी राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनी

ऑनलाईन टेस्ट

# ६. नैसर्गिक प्रदेश

## स्वाध्याय

**प्रश्न १. खालील विधाने लक्षपूर्वक वाचा. चूक असल्यास विधाने दुरुस्त करून पुन्हा लिहा.**

(१) पश्चिम युरोपीय प्रदेशांतील लोक सौम्य व उबदार हवामानामुळे उत्साही नसतात.

(२) प्रेअरी प्रदेशाला 'जगातील गव्हाचे कोठार' असे म्हणतात.

(३) भूमध्य सागरी प्रदेशातील झाडांची पाने मेणचट असतात आणि झाडांची साल फार जाड असते. झाडांतील पाण्याचे बाष्पीभवन जास्त होते.

(४) उष्ण वाळवंटी प्रदेशात 'उंट' हा महत्त्वाचा प्राणी आहे, कारण तो अन्नपाण्याशिवाय दीर्घकाळ राहतो, तसेच वाहतुकीसाठी उपयोगी आहे.

(५) वाघ, सिंहासारखे मांसभक्षक प्राणी विषुववृत्तीय प्रदेशांत जास्त आढळतात.

**प्रश्न २. भौगोलिक कारणे द्या.**

(१) मोसमी प्रदेशात प्रामुख्याने शेतीव्यवसाय करतात.

(२) विषुववृत्तीय वनातील वृक्ष उंच वाढतात.

(३) टुंड्रा प्रदेशात वनस्पती जीवन अल्पकाळ टिकणारे असते.

**प्रश्न ३. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**


(१) तैगा प्रदेशाचा विस्तार कोणत्या अक्षवृत्तांदरम्यान आहे?

(२) सुदान प्रदेशातील कोणतेही तीन तृणभक्षक प्राणी सांगा. त्यांच्या स्वसंरक्षणासाठी निसर्गाने कोणती व्यवस्था केली आहे?

(३) मोसमी प्रदेशांखाली दिलेली वैशिष्ट्ये कोणती?

**प्रश्न ४. जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील नैसर्गिक प्रदेश दाखवा. सूची तयार करा.**

- कोलोरॅडो वाळवंट
- डाऊन्स गवताळ प्रदेश
- भूमध्य सागरी हवामान
- ब्रिटिश कोलंबिया
- ग्रीनलँडचा लोकवस्ती असलेला भाग




**उपक्रम :**

आंतरजालाचा वापर करून या प्रकरणातील माहिती पडताळून पहा. विविध नैसर्गिक प्रदेशांतील वनस्पती, प्राणी व लोकजीवन यांची चित्रे जमा करा. जगाच्या नकाशावर ती चिकटवून कोलाज तयार करा.

**वाचा समजून घ्या.**

# 11. पेशीरचना आणि सूक्ष्मजीव

अ. **पेशीभित्तिका :** पेशीभित्तिका हे पेशीचे सर्वांत बाहेर असणारे आवरण आहे. पेशीभित्तिका फक्त वनस्पतीपेशींमध्येच आढळते.

आ. **पेशीपटल :** पेशीपटल हे एक प्रकारचे पातळ आवरण असून ते अतिशय नाजूक, लवचीक असते व ते प्राणी पेशीचे सर्वांत बाहेरचे आवरण असते.

इ. **पेशीद्रव :** पेशीमध्ये पेशीकेंद्रकाव्यतिरिक्त द्रवरूप भाग असतो त्याला पेशीद्रव म्हणतात. पेशीद्रव हे पेशीपटल आणि केंद्रक यांदरम्यान असते. पेशींची विविध अंगके यामध्ये विखुरलेली असतात.

ई. **पेशी अंगके :** यांमध्ये प्रामुख्याने केंद्रक, आंतरर्द्रव्यजालिका, गॉल्जीपिंड, लयकारिका, रिक्तिका, तंतुकणिका, लवके यांचा समावेश होतो. वनस्पतीं पेशींमध्ये हरितलवक असते.

वनस्पती व प्राणी पेशीमधील समान तसेच वेगवेगळे घटक कोणते आहेत ते सांगा.

केंद्रक हे पेशीचे सर्वांत महत्त्वाचे अंगक आहे. त्याच्या भोवती दुहेरी, सछिद्र पटल असते. पेशींची सर्व कार्य केंद्रकच नियंत्रित करते. आंतरर्द्रव्यजालिका हे एक विस्तृत, जाळीदार अंगक आहे. हे रायबोझोमने तयार केलेल्या प्रथिनांमध्ये आवश्यक असे बदल करून त्यांना गॉल्जिपिंडाकडे पाठवण्याचे काम करते. गॉल्जिपिंड हे अनेक चपट्या पिशव्यांनी तयार झालेले असून प्रथिनांचे योग्य वितरण करण्याचे काम गॉल्जिपिंडामार्फत होते. तंतुकणिका व लवके ही दुहेरी आवरण असलेली अंगके आहेत. तंतुकणिका ऊर्जा तयार करतात म्हणून त्यांना पेशींचे ऊर्जाकेंद्र असे म्हणतात. वनस्पती पेशींमधील हरितलवके प्रकाशसंश्लेषणाचे कार्य करतात. रिक्तिका ह्या पेशीतील टाकाऊ पदार्थ बाहेर टाकण्याचे काम करते. प्राणीपेशींमधील रिक्तिका आकाराने छोट्या असतात तर वनस्पतीपेशींमध्ये एकच मोठी रिक्तिका असते.




1. पेशींना निश्चित आकार कशामुळे प्राप्त होतो ?
2. पेशींचे संरक्षण कशामुळे होते ?
3. पेशींच्या गरजा कोणत्या आहेत ?

## सूक्ष्मजीव (Micro-organisms)




1. सूक्ष्मजीव म्हणजे काय ?
2. अमीबा, पॅरामेशिअम, युग्लीना, गोगलगाय, हत्ती, कबुतर, जंत यांचे आकारांनुसार दोन गटांत वर्गीकरण करा.

पृथ्वीतलावर असंख्य सजीव आहेत. त्यांपैकी जे आपल्या डोळ्यांनी सहज दिसत नाहीत, ते पाहण्यासाठी सूक्ष्मदर्शकाचा वापर केला जातो. अशा सजीवांना **सूक्ष्मजीव** म्हणतात हे आपण अभ्यासले आहे.

## सूक्ष्मजीवांचा आढळ (Occurrence of Micro-organisms)

आपल्या सभोवताली हवा, पाणी, जमीन, अन्नपदार्थ, सांडपाणी, कचरा यांबरोबर वनस्पती, प्राणी व मानवी शरीरामध्ये सूक्ष्मजीवांचे अस्तित्व असते. यांपैकी काही सूक्ष्मजीव हे एकटे राहतात, उदाहरणार्थ, अमीबा, पॅरामेशिअम, तर काही बहुसंख्येने वसाहती करून राहतात. काही सूक्ष्मजीव हे मृत वनस्पती, प्राणी यांच्या अवशेषांवर जगतात.

**वाचा व प्रश्न तयार करा.**

## 11. Cell Structure and Micro-organisms

The cell has four main parts - the cell wall, cell membrane, cytoplasm and cell organelles.

(a) **Cell wall :** The cell wall is the outermost covering of a cell. It is present only in plant cells.

(b) **Plasma membrane :** The plasma membrane, also called the cell membrane, is a kind of thin covering. It is extremely delicate and flexible. It is the outermost covering of animal cells.

(c) **Cytoplasm :** The liquid part in the cell, present around the nucleus is called cytoplasm. It occupies the space between the plasma membrane and nucleus. Cell organelles are scattered in the cytoplasm.

(d) **Cell organelles :** These mainly include the nucleus, endoplasmic reticulum, Golgi bodies, lysosomes, mitochondria, vacuoles, plastids, etc. Plant cells contain chloroplasts.

Which are the common components of plant and animal cells? Which are the different ones?

The nucleus is the most important organelle of the cell. There is a porous double membrane around it. The nucleus controls all functions of the cell. The endoplasmic reticulum is a sprawling net-like organelle. Its function is to make necessary changes in the proteins produced by ribosomes and send them to the Golgi bodies. Golgi bodies are made up of several flat sacs. Their function is the proper distribution of proteins. Mitochondria and plastids are organelles with double outer coverings. As mitochondria produce energy, they are called the powerhouses of the cell. The chloroplasts in plant cells carry out the function of photosysthesis. Vacuoles help to throw out waste products of the cell. Vacuoles in animal cells are small whereas there is only one large vacuole in a plant cell.



**Use your brain power!**

1. How do the cells acquire definite shapes?
2. How are cells protected?
3. What are the needs of cells?

### Micro-organisms



**Let's recall.**

1. What is meant by micro-organisms?
2. Categorise the following organisms into two groups, according to size - amoeba, paramoecium, euglena, snail, elephant, pigeon, worms.

We have learnt that there are countless living organisms on the earth. Of these, the organisms which cannot be seen with our eyes but can only be observed under a microscope are called **micro-organisms.**

### Occurence of micro-organisms

Micro-organisms are present all around us in the air, water, soil, food, sewage, garbage as well as in the bodies of plants and animals, including humans. Some micro-organisms are solitary, that is, they live singly, e.g. amoeba, paramoecium, whereas some live in colonies. Some micro-organisms live on the remains of dead plants and animals.

**understand.**

धन – दौलत

१. अथक परिश्रम से उसने **धन–दौलत** कमाई ।

------ – ------

५. बाजार से बहुत सारे -------- खरीदकर लाए ।

------ – ------

२. सेहत के लिए -------- अच्छा होता है ।

------ – ------

६. बच्चों ने मैदान पर फैला -------- इकट्ठा किया ।

------ – ------

३. दीपावली में -------- मिठाइयाँ बनती हैं ।

------ – ------

७. समारोह में सभी ------- वालों को आमंत्रित किया ।

------ – ------

४. अंतरजाल की सुविधा -------- में उपलब्ध है ।

------ – ------

८. बगीचे में आते ही सभी बच्चे-------- दौड़ने लगे ।

## नए शब्द समझो ।

## माझा ऑनलाईन अभ्यास – सराव चाचणी

| इयत्ता सातवी - मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| ऑनलाईन टेस्ट अपडेट होत आहेत. | |
| 11. बाली बेट | Click Here |
| 12. सलाम नमस्ते | Click Here |
| 13. अनामवीरा | Click Here |

| | |
|---|---|
| 14. कवितेची ओळख | Click Here |
| इयत्ता सातवी - इतिहास | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
| 7. स्वराज्याचा कारभार | Click Here |
| 8. आदर्श राज्यकर्ता | Click Here |
| 9. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम | Click Here |
| इयत्ता सातवी - नागरिकशास्त्र | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
| 4. मुलभूत हक्क भाग 1 | **लवकरच** |
| इतर टेस्ट लवकरच अपडेट होतील. | |




निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे वेब स्त्रोत-'ई-बालभारती' सौजन्य-, जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in